**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १६/०५/२०२४ (गुरूवार) सकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
## वाहनासह एकुण २५,२५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक १५/०५/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, भंडारा कडुन मौदा कडे एक टिप्पर वाहन अवैधरीत्या विनापरवाना रेती लोड करून नागपूरकडे वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून यादव पेट्रोलपंप मारोडी शिवार येथे अवैध रेती संबंधाने नाकाबंदी करून १० चक्का टिप्पर क्र. एम.एच—४९/ए. टी— ५७७६ चा चालक **आरोपी नामे— सोनू खेमलाल कूलपे वय ४४ वर्ष रा. प्लॉट क्र. ५७ अभिजीत नगर दत्तवाडी नागपूर** याचे वाहनास स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे ०५ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर टिप्पर चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून १० चक्का टिप्पर क्र. एम.एच—४९/ए. टी— ५७७६ किंमती २५,०००००/—रू. मध्ये ०५ ब्रास रेती किंमती २५,०००/—रू. असा एकुण २५,२५,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे— सोनू खेमलाल कूलपे वय ४४ वर्ष रा. प्लॉट क्र. ५७ अभिजीत नगर दत्तवाडी नागपूर** याचेविरुद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३, ४ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. किशोर शेरकी, पोना प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर